# मुंबई विद्यापीठ

## उमेदवारांसाठी सुचना

(१) **उमेदवारांनी प्रचार करताना त्यांच्या प्रचाराच्या कोणत्याही साहित्यावर विद्यापीठाचा बोधचिन्ह (Logo) वापरू नये.**

(२) मतदान केंद्रावर प्रतिनिधींची नेमणूक करण्यासाठी प्रतिनिधी हा मतदार असणे आवश्यक आहे. प्रतिनिधी हा त्याच मतदान केंद्रातील मतदार असेल तर उमेदवाराला त्याच दिवशी तसेच प्रतिनिधी हा इतर मतदान केंद्रातील मतदार असेल तर उमेदवाराला मतदानाच्या अगोदर दोन फोटोसह नमुना (अ) मध्ये मतदान केंद्रावर निवडणूक अधिकाऱ्यांकडे अर्ज सादर करावा लागेल.

(३) प्रतिनिधींना मतदान कक्षात भ्रमणध्वनी, टॅबलेटस् किंवा इतर कोणतेही इलेक्ट्रॉनिक संपर्क साधन घेऊन जाण्याची परवानगी नाही.

(४) उमेदवारांनी मतदानासाठी येणाऱ्या मतदारांस कोणत्याही सुचना, चिठ्ठया व इतर कोणत्या प्रकारची माहिती देऊ नये.

(५) प्रत्येक मतदान प्रतिनिधीला नमुना (ब) प्रमाणे ओळखपत्र देण्यात येईल.

(६) मतदान केंद्राच्या परिसरापासुन १०० मीटर अंतराच्या आत कोणत्याही संस्था/उमेदवार/प्रतिनिधी इत्यादींना मतदान केंद्रावर कोणत्याही प्रकारची भिंती पत्रके, झेंडे अथवा बॅनर्स मतदानाच्या आदल्या दिवशी व मतदानाच्या दिवशी लावण्यास बंदी असेल. तसेच लावलेले बॅनर्स स्वत:हून काढावे लागतील. विद्यापीठ निवडणूक विभागाच्या निवडणुकीसंबंधीत वाहनाव्यतीरिक्त अन्य कोणत्याही वाहनास मतदान केंद्राच्या परिसरात प्रवेश करता येणार नाही.

(७) मतदान केंद्राच्या परिसरात फक्त उमेदवार व त्यांचे अधिकृत प्रतिनिधी, मतदार आणि निवडणुकसंबंधी कर्मचारी/अधिकारी यांनाच प्रवेश असेल.

(८) बोगस मतदार आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

(९) सुचनांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुध्द नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

(१०) मतदार केंद्रावर निवडणूकीसंबंधी कोणताही वाद निर्माण झाल्यास निवडणूक अधिकारी परिनियम व कायद्याच्या आधारे योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

(११) सर्व उमेदवारांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ एकरूप परिनियम मुद्दा क्र. १२ व १५ प्रमाणे मतदान/मतपत्रिका छाननी व मतमोजणी वेळी काळजी घ्यावी.

(१२) मतपत्रिका छाननी आणि मतमोजणी वेळी उमेदवार अथवा उमेदवाराचा प्रतिनिधी पैकी एका वेळी एकच उपस्थित राहू शकेल.

(१३) सकाळी मतदान सुरू करण्याआधी मतपेटया दाखवून सिलबंद करताना व मतदान झाल्यावर सिलबंद करतांना उमेदवार किंवा त्यांच्या प्रतिनिधी समोर सीलबंद करून त्यावर त्यांची स्वाक्षरी घेण्यात येईल. उमेदवार/प्रतिनिधी उपस्थित नसल्यास निवडणूकीच्या कामावर असलेल्या अधिकारी कर्मचारी यांच्या उपस्थितीत ही प्रक्रिया पार पाडण्यात येईल व त्यावर त्यांची स्वाक्षरी घेण्यात येईल.

* * * * *

# निवडणुक प्रतिनिधी नेमणूक करणे, नमुना (अ)

दिनांक:

प्रति,
कुलसचिव-तथा-निवडणुक निर्णय अधिकारी,
मुंबई विद्यापीठ,
फोर्ट,
मुंबई- ४०० ०३२

विषय :- दि. ............. रोजी होणाऱ्या ................ मतदार संघाच्या निवडणुकीसाठी निवडणुक प्रतिनिधींची नेमणुक करणे बाबत.

महोदय,

वरील विषयास अनुसरुन मी आपणांस विनंती करतो/करते की मतदान केंन्द्र क्रमांक ......... करीता श्री/श्रीमती/कु ........................................................ यांची निवडणुक प्रतिनिधी म्हणुन नेमणुक करावी.

प्रतिनिधीचा फोटो

प्रतिनिधींचे नाव:- श्री/श्रीमती/कु --------
----------------------------------

मतदार क्रमांक :- --------------------

आपला विश्वासु

स्वाक्षरी:- ---------------------------

(उमेदवाराचे नाव व सही)

---

## नामनिर्देशन छाननी/मतमोजणी/मतदान केंन्द्रासाठी नमुना (ब)

**मुंबई विद्यापीठ**

**अधिसभा/विद्यापरिषद/अभ्यासमंडळ निवडणूक**

**मतदान प्रतिनिधी यांचे नांव :-** ..............................................
..................................................

**मतदान केंद्राचे नांव व क्रमांक :-** ...............................................

**दिनांक :-**

**कुलसचिव तथा निवडणुक निर्णय अधिकारी**
**मुंबई विद्यापीठ**

**(हस्तांतरणीय नाही)**